स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२५–२६/३३६ दि. १६/१०/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : महाराष्ट्र राज्यातील सोलापूर व मराठवाडा या भागातील पूरग्रस्त जिल्ह्यातील नागरिकांसाठी संकलित करण्यात आलेली मदत जमा करणेबाबत...

संदर्भ : १.मा.राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.१३/१०/२०२५ रोजीचे पत्र

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्यातील सोलापूर व मराठवाडा या विभागात अतिवृष्टीमुळे गंभीर पूरस्थिती निर्माण झाली होती. हजारो कुटुंबे उध्वस्त झालेली आहेत. तरी महाविद्यालयांमध्ये पूरग्रस्तांसाठी जे साहित्य संकलन करण्यात आलेले आहे. त्यांची रासेयो स्वयंसेवकांमार्फत वर्गवारी करण्यात यावी. ज्या विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन शिबिर(आव्हान) यामध्ये सहभाग नोंदविला असेल अशा विद्यार्थ्यांचा सहभाग घेवून सर्व वर्गवारी केलेले संकलित साहित्य आपल्या जिल्ह्याचे मा. जिल्हाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेकडे जमा करावयाचे आहे.

सदर संकलित साहित्य जमा करित असताना आपल्या महाविद्यालयांमधील सर्व रासेयो स्वयंसेवकाच्या समूह सहभागाने रॅलीद्वारे जमा करावे. सदरील रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना बॅनर, फ्लेक्स इत्यादी समावेश करण्यात यावा. याबाबत स्थानिक वृतपत्र प्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात यावे. तसेच सदर संकलित व वितरीत केलेल्या साहित्याचा अहवाल https://forms.gle/ZQgUcLxz2qWrjLQk6 या गुगल फॉर्ममध्ये दि. २५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भरणे अनिवार्य आहे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई- मेल - nssmantralaya@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५


**क्रमांक: रासेयो- २०२५/प्र.क्र.१००/रासेयो कक्ष** **दिनांक: १३ ऑक्टोंबर , २०२५**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**

**सर्व रासेयो संलग्नित कृषि व अकृषि विद्यापीठे, संचालनालये/अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.**

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील सोलापूर व मराठवाडा या भागातील पूरग्रस्त जिल्ह्यातील नागरिकांसाठी संकलित करण्यात आलेली मदत जमा करणेबाबत....**

**संदर्भ :- या कार्यासनाचे सम क्रमांकाचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ चे पत्र कृ. पहावे.**

उपरोक्त विषयास अनुलक्षून आपणास सूचित करण्यात येते की, सोलापूर व मराठवाडा विभागात अतिवृष्टीमुळे गंभीर पूरस्थिती निर्माण झाली होती, हजारो कुटुंबे उध्वस्त झालेली आहेत. पूरग्रस्तांना तातडीने मदतीची आवश्यकता होती. राष्ट्रीय सेवा योजना ही समाजाभिमुख व सेवाभावी चळवळ असल्याने, या आपत्कालीन परिस्थितीत आपण सर्व रासेयो संचालकांनी रासेयो स्वयंसेवकांच्या माध्यमातून तातडीने मदत संकलन उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला त्याबाबत आपणा सर्वाचे अभिनंदन.

उपरोक्त उपक्रमाच्या माध्यमातून विद्यापीठनिहाय व आपल्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये पूरग्रस्तांसाठी जे साहित्य संकलन करण्यात आलेले आहे त्यांची NSS स्वयंसेवकांमार्फत वर्गवारी करण्यात यावी. ज्या विद्यार्थांनी आपत्ती व्यवस्थापन शिबिर (आव्हान) यामध्ये सहभाग नोंदविला असेल अशा विद्यार्थ्यांचा सहभाग घेवून सर्व वर्गवारी केलेले संकलित साहित्य आपल्या जिल्हयाचे **मा. जिल्हाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन कक्ष** यांचे कडे जमा करावयाचे आहे. संकलित साहित्य जमा करीत असताना विद्यापीठनिहाय व आपल्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील सर्व रासेयो स्वयंसेवकाच्या समूह सहभागाने रॅलीव्दारे जमा करावे. सदरील रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना बॅनर, फ्लेक्स इ. समावेश करण्यात यावा. याबाबत स्थनिक वृतपत्र प्रतिनिधी,मिडीया प्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात यावे, याबाबत रासेयो समन्वयक तथा संचालक यांनी आपल्यास्तरावरुन योग्य नियोजन करावे व याबाबतचा अहवाल राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष, मुंबई या कार्यालयाला दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत कळविण्यात यावा.

**(डॉ.मिलिंद काळे)**

राज्य संपर्क अधिकारी, विशेष कार्य अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन